SHIVAJI UNIVERSITY
**KOLHAPUR-416004,_MAHARASHTRA**
PHONE: 0231- 2609298, 2609495
FAX : 0091-0231-2690655
Website : www.unishivaji.ac.in
e-mail : examlapses@unishivaji.ac.in

Estd.:1962
'**A**' Re-accredited by NAAC (2014) with CGPA- 3.16

===========================================================================

संदर्भ जा.क्र. : शिवाजी वि./परीक्षा प्रमाद/भरारी पथक–2016/168 दि. : 16 जानेवारी 2016

प्रति,

मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नीत महाविद्यालये,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

विषय : विद्यापीठ परीक्षा भरारी पथकातील (Exam Flying Squad) समन्वयक/सदस्य नियुक्तीसाठी शिक्षकांची नांवे पाठविण्या बाबत....

महोदय/महोदया,

वर्ष 2016 मध्ये मार्च/एप्रिल 2016 आणि ऑक्टो./नोव्हें. 2016 या परीक्षा सत्रात विद्यापीठाच्या विविध परीक्षां कोल्हापूर/सांगली/सातारा जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयामध्ये/परीक्षां केंद्रावर आयोजित केल्या जाणार आहेत. विद्यापीठाच्या विविध परीक्षां चालू असलेल्या कालावधीत परीक्षेत कॉपी व इतर गैरप्रकार होऊ नयेत व परीक्षा निकोप वातावरणात व्यवस्थित व सुरळीत पार पाडण्यासाठी सदरच्या तीन जिल्ह्यांसाठी तीन ते पाच सेशनमध्ये विद्यापीठ परीक्षा भरारी पथके (Exam Flying Squad) नियुक्त करण्यात येतात.

विद्यापीठ भरारी पथकात समन्वयक/सदस्य यांची आवश्यकतेनुसार मा. कुलगुरू यांचे आदेशान्वये नियुक्ती करण्यात येते. यासाठी आपल्या महाविद्यालयातील कायम सेवेत असणाऱ्या किमान पाच वर्षे अध्यापनाचा अनुभव असलेल्या शिक्षकांची माहिती खाली दिलेल्या तक्त्यांप्रमाणे भरून पाठवावी.

| अ. नं. | कायम सेवेतील शिक्षकांचे संपुर्ण नांव | विषय | एकूण सेवेचा कालावधी / अनुभव वर्ष | घरचा संपूर्ण पत्ता | दूरभ्रमण / दूरध्वनी नंबर | सेवा निवृत्तीची तारीख |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| | | | | | | |
| | | | | | | |

तरी वरील तक्त्यांप्रमाणे आपल्या महाविद्यालयातील सद्या कार्यरत असलेल्या कायम सेवेतील शिक्षकांची माहिती दि. **30 जानेवारी 2016** पर्यंत पाठवून सहकार्य करावे. सदरची माहिती देणे अनिवार्य आहे. मा. कुलगुरू यांचे आदेशान्वये परीक्षा भरारी पथकात काम करणारे समन्वयक/सदस्य हे विद्यापीठाचे प्रतिनिधी म्हणून विविध परीक्षां केंद्रांना भेटी देण्याचे काम करीत असतात. महाराष्ट्र विद्यापीठे कायदा कलम 32(5)(g) नुसार परीक्षेचे काम महत्वाचे असल्याने जर आपल्या महाविद्यालयातील शिक्षकांची भरारी पथकात नियुक्ती केली गेली, तर त्यांना दिलेल्या कालावधीसाठी प्राधान्याने कार्यरत रजा देवून सहकार्य करावे.

कळावे,

आपला विश्वासू,

*सही/–*

**सहाय्यक कुलसचिव**
(ऑन एक्झाम)